# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०८/०९/२०२५ ( सोमवार )**

---

## खुन करणाऱ्या अज्ञात आरोपीतांचा अवघ्या ४ तासात घेतला शोध, स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कुही** :— दिनांक ०७/०९/२०२५ रोजी मृतक नामे देवराव शामराव घरजाळे, वय ५६ वर्ष, रा. प्लॉट नं. ०६ शिवांगी नगर, बोरकर हॉस्पीटल समोर, नागपूर हे त्यांचे मो.सा. क्र. एमएच ४९ डब्लु ४८८९ ने मौजा कुसूंबी येथे जाण्याकरीता घरून एकटेच निघाले असता पोलीस स्टेशन कुही अंतर्गत उमरगाव ते पांढरकवडा रोडवरील टर्निंग जवळ कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणावरून त्यांच्या गळयावर तसेच संपुर्ण शरीरावर धारदार शस्त्राने वार करून जिवानिशी ठार मारले आहे अशा रिपोर्टवरून पोलीस स्टेशन कुही येथे खुनाचा गुन्हा नोंद होता.

आरोपी अज्ञात असल्याने मा. वरीष्ठ अधिकारी यांच्या मार्गदर्शनात कुही पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तात्काळ तपास सुरू केला. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कौशल्यपुर्ण तपास करून अवघ्या ४ तासात गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे नमुद गुन्हयात आरोपी नामे १) अंकित संजय येळणे, वय २६ वर्षे, रा. पिपळा, हुडकेश्वर २) आरोपी नामे मुक्तेश्वर ज्ञानेश्वर मेश्राम, वय ३८ वर्षे रा. दुबेनगर, पिंपळा, हुडकेश्वर नागपूर, ३) आरोपी नामे गजानन नामदेवराव कडू , वय ३८ वर्षे, रा. पिपळा हुडकेश्वर, ४) गणेश गंगाराम हुड, वय ३८ वर्षे, रा. दुधाळा तह. मौदा जि.नागपूर यांचा गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न केले. आरोपीतांना ताब्यात घेवुन विचारपुस केली असता आरोपी नामे अंकित संजय येळणे हा मृतकाचा नातेवाईक असुन त्याने प्रॉपर्टीच्या वादातुन त्याने त्याचा मित्र आरोपी नामे मुक्तेश्वर ज्ञानेश्वर मेश्राम याला सदर खुन करण्यासाठी सांगितले होते. अंकित येळणे याला माहीत होते की, दिनांक ०७/०९/२०२५ रोजी मृतक हे मौजा कुसूंबी येथे जाणार आहे. त्यामुळे त्याने

आरोपी मुक्तेश्वर आणि गणेश हुड यांना पोलीस स्टेशन कुही अंतर्गत उमरगाव ते पांढरकवडा रोडवरील टर्निंग जवळ नेवुन सोडले. मृतक नामे देवराव शामराव घरजाळे घराबाहेर पडल्याची माहीती गजानन नामदेव कडु याने आरोपीतांना दिली. मुक्तेश्वर आणि गणेश यांनी दिनांक ०७/९/२५ चे ०९.०० वा ते १०.०० वा धारदार चाकुने वार करून मृतकाचा खुन केल्याची माहीती प्राप्त झाली.सदर आरोपीतांना स्थानिक गुन्हे शाखेने ताब्यात घेवुन पोलीस स्टेशन कुहीला हस्तांतरीत केले आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असुन पुढील तपास कुही पोलीस करीत आहेत.



**स्थानिक गुन्हे शाखेचे पथक**

## गोवंश जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद
## २२ गोवंश जनावरांची सुटका,बेला पोलसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन बेला** :— दिनांक ०८/०९/२०२५ रोजी बेला पोलीस सिर्सी बस स्टॉप समोर नाकाबंदी करीत असतांना बेला पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, उमरेड मार्गे लाल रंगाच्या आयशर ट्रक मध्ये अवैधरित्या गोवंश जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांना नाकाबंदी दरम्यान लाल रंगाचा आयशर ट्रक क्रमांक एम. एच. ३६ ए.ए. ३०२५ उमरेड कडुन येताना दिसला. पोलीसांनी वाहन थांबविण्याचा इशारा केला असता यातील चालक पोलीसांना पाहुन दुर अंतरावर वाहन थांबवुन अंधाराचा फायदा घेत पळुन गेला. पोलीसांनी आरोपीला पकडण्यासाठी पाठलाग केला परंतु आरोपी मिळुन आला नाही. पोलीसांनी वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये २२ गोवंश जनावरे असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन,शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून एक आयशर ट्रक क्रमांक एम. एच. ३६ ए.ए. ३०२५ किंमती ४,००,०००/— रूपये आणि २२ गोवंश जनावरे किंमती १,७६,००० /— रूपयाचा एकुण किंमती ५,७६,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला.

नमुद प्रकरणी आयशर ट्रक क्रमांक एम. एच. ३६ ए.ए. ३०२५ चा चालक आणि मालक यांच्या विरूध्द महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम सहकलम प्राण्यांचा छळ अधिनियम ,महाराष्ट्र पोलीस कायदा आणि मोटर वाहन कायदयाअन्वये गुन्हा नोंद केला आहे.

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## भिवापुर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन भिवापुर** :— दिनांक ०७/०९/२०२५ रोजी भिवापुर पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेती ची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी पोलीस स्टेशन भिवापूर, टी पाईन्ट येथे

नाकाबंदी केली असता ट्रक क्रमांक एम. एच. ४० सी. डब्लू. ९७९६ मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. **ट्रक चालक बादल रामप्रसाद भुरे, वय २५ वर्ष, रा. वार्ड नं ०२ राम नगर, कन्हान पिंपरी ता. पारशिवनी जि. नागपुर** याला रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. वाहन मालकाचे नाव **शुभम रडके, वय २५ वर्ष, रा. नागपुर जि. नागपूर** असे असल्याची माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष १) ट्रक क्र एम एच ४० सी डब्लू ९७९६ किमती २०,००,०००/— रूपये व २) १० ब्रास रेती किंमती ७०,०००/— रूपये आणि असा एकुण २०,७०,०००/— रूपयेचा माल जप्त करण्यात आला.

नमुद ट्रक चालक आणि मालक यांच्या विरूध्द पोस्टे भिवापुर येथे कलम ३०३(२) भा. न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४,२१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम, सहकलम १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अवैध शस्त्र बाळगणाऱ्या अरोपीविरूध्द गुन्हा नोंद

**पो.स्टे. कन्हान** :— दिनांक ०७/०९/२०२५ रोजी कन्हान पोलीस हे पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदाराद्वारे खात्रीशिर माहीती मिळाली की, टेकाडी ग्राम पंचायत जवळ, एक इसम हातामध्ये चाकु घेवून फिरत आहे. त्यामुळे लोकांच्या मनात भिती निर्माण झाली आहे. मिळालेल्या माहीतीन्वये पोलीसांनी तात्काळ पंचासह नमुद ठिकाणी जावुन पाहणी केली असता एक आरोपी नामे **मनोहर व्यंकट संतापे, वय ३९ वर्ष,रा. हनुमान चौक वार्ड नं ०४ , टेकाडी कन्हान** हा मिळुन आला. पोलीसांनी नमुद आरोपीची पंचसमक्ष अंगझडती घेतली असता त्याचे जवळ एक चाकु मिळुन आल्याने जप्त करण्यात आला

नमुद आरोपी विरूद्ध पोस्टे कन्हान येथे कलम ४/२५ शस्त्र अधिनियम सह कलम १३५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा भिवापुर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन भिवापुर** :— दिनांक ०७/०९/२०२५ रोजी भिवापुर पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, आयशर ट्रक मध्ये अवैधरित्या जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी पोलीस स्टेशन भिवापूर, टी पाईन्ट येथे नाकाबंदी केली असता संशयीत पांढ—या रंगाचा आयसर ट्रक कमांक एम. एच. २६ ए. डी. ०६१० मिळुन आले. वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये १२ म्हशी व ०५ लहान वघार यांची निर्दयते कोंबुन वाहतुक करतांना मिळुन आले . **वाहन चालक / मालक नामे संभाजी बालाजी गिते, वय ३९ वर्ष, रा. शेल्लाळी पोस्ट आंबुलगा, ता. कंधार, जि. नांदेड,** हा मिळुन आला. त्यांला जनावारांबाबत कागदपत्रांची विचारणा केली असता त्यांच्याकडे कागदपत्रे नव्हती. पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीच्या ताब्यातुन एक आयसर ट्रक कमांक एम. एच. २६ ए. डी. ०६१० किंमती ५,००,०००/— रूपये. व १७ जनावरे (म्हशी)किंमती १,९५,०००/— रूपयाचा एकुण किंमती ६,९५,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.

नमुद आरोपी विरूध्द प्राण्यांचा छळ प्रतीबंध अधिनियम, महाराष्ट्र पोलीस अधिनियम आणि मोटर वाहन अधिनियम मो.वा.का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक

दिनांक ७/०९/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक ०८/०९/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्री सागर खर्डे, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर विभाग यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. तसेच पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत सावनेर टाउन, पहीलेपार, सटवा माता मंदीर येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले. सदर कोबिंग ऑपरेशन श्री सागर खर्डे यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. ४ धाब्यांवर कारवाई करण्यात आली.




मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने